Vol 6 Issue 8 May 2017

ISSN No : 2249-894X

*Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

*Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 8 | may - 2017

Review Of Research

# हैण्डबॉल व फुटबॉल खेळाडूंची खेळ भावना व मानसिक स्वास्थ्य

डॉ. सोहन रा. सातपुते
श्री कृष्ण शारिरिक शिक्षण महाविद्यालय, वर्धा.

**सारांश–**
जिज्ञासा अथवा ज्ञान संपादन करणे ही माणसाची एक मूलभूत प्रवृत्ती आहे. त्यासाठी तो आपल्या ज्ञानेंद्रियांचा उपयोग करीत असतो. भोवतालच्या जीवनाचे अवलोकन करतो व त्यापासून विविध प्रकारचे अनुभव घेतो. प्रत्येक घटनेबद्दल का? कसे व काय? ह्या प्रश्नांची उत्तरे आपल्या बुध्दीने शोधून काढतो व मिळविलेल्या ज्ञानाचा आपल्या जीवनात उपयोग करतो, म्हणजेच कोणतेही शास्त्र हे केवळ सैध्दांतिक नसून ते उपयुक्त स्वरूपाचे असते. आज संशोधन कार्यामुळे शारीरिक शिक्षण आणि क्रिडा क्षेत्रात नविन नविन अविष्कार होत आहेत. संशोधन कार्यामुळेच आज आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाचा स्तर उंचावलेला दिसत आहे. काल अशक्य वाटणारी गोष्ट आज शक्य झालेली दिसत आहे. एका देशात एका ठिकाणी केलेल्या संशोधनाचे परिणाम दुसऱ्या ठिकाणी दुसऱ्या वातावरणात केलेल्या संशोधनाच्या परिणामासारखे असेलच असे नाही.

## प्रस्तावना–

### संशोधन – स्वरूप व व्याप्ती

संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तत्वे अथवा तथ्ये शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये व तत्वे परीक्षणासाठी तयार केलेला चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास. अर्थात, जुन्या ज्ञानाचे परीक्षण, नवीन ज्ञान संपादन हे दोन्ही घटक त्यात आहेतच. हे ज्ञान संपादन करण्यासाठी जे पध्दतशीर प्रयत्न केले जातात. त्यांचाही समावेश त्यात आहे. संशोधन किंवा अनुसंधान ही एक बौध्दिक प्रक्रिया आहे. त्यातून जुन्या उणिवा दूर करून ज्ञानात नवी भर घातली जाते.

१) जे. डब्ल्यू. वेस्ट– ह्यांच्या मते, “संशोधन म्हणजे वैज्ञानिक पध्दती प्रत्यक्ष कार्यान्वित करण्याची सुव्यवस्थित व नियमबध्द अभ्यासण्याची प्रक्रिया होय.”

२) मोझर– ह्या शास्त्रज्ञाच्या मते, “सामाजिक घटना व सामाजिक समस्यांच्या बाबतीत नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्याच्या उद्देशाने केलेले क्रमबध्द प्रयत्न होय.”

३) स्लेसिजर व स्टीफेन्सन– ह्यांच्या मते, संशोधनप्रक्रियेचे तीन पैलू आहेत.

• सामान्यीकरणाच्या हेतून संकल्पना व प्रतिके ह्यांची हेतूपूर्वक हाताळणी.

• प्रस्थापित ज्ञानाच्या कक्षा वाढविणे, ज्ञानात सुधारणा करणे व ज्ञान प्रमाणित करणे.

•प्रमाणित ज्ञानाचा सिध्दान्तनिर्मितीसाठी व व्यवहारासाठी उपयोग करणे.

सारांश हा की, संशोधन ही एक पध्दतशीर व वैज्ञानिक प्रक्रिया असून ह्या प्रक्रियेद्वारे सामाजिक जीवनासंबंधी नवीन तथ्यांचा शोध घेतला जातो किंवा विद्यमान तथ्यांची व्याप्ती वाढविली जाते अथवा जुन्या तथ्यांचे पुर्नस्पष्टीकरण केले जाते व विविध घटना, त्यांची कारणे व त्यांचा परिणाम यांचा शोध घेतला जातो.

प्रस्तुत संशोधनकार्य हे एक शैक्षणिक संशोधन आहे. रेडमेल आणि मोरी ह्या शास्त्रज्ञांच्या मते, संशोधन म्हणजे नवीन ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी केलेले पध्दतशीर प्रयत्न. ज्याद्वारे नवीन ज्ञान प्रकाशात आणले जाते किंवा जुन्या ज्ञानातील उणिवा सुधारल्या जाऊन त्यातुन नवीन ज्ञानाची भर घातली जाते. त्याचप्रमाणे, कॉफोर्ड ह्यांच्या मताप्रमाणे संशोधन म्हणजे कोणत्यातरी समस्येच्या सोडवणुकीसाठी क्रमबध्द व विशुध्द चिंतन तथा विशिष्ट उपकरणाद्वारे केलेला प्रयोगविधी. कोणतेही संशोधन जेव्हा शैक्षणिक तथ्ये, घटना, सिध्दान्त अथवा नवीन ज्ञान ह्या बाबतीत संबंधित असते, तेव्हा त्याला शैक्षणिक संशोधन म्हणतात.

### संशोधन प्रक्रिया :

संशोधन कार्यासाठी निर्दोष माहिती मिळण्यासाठी व संशोधनाची उद्देशपुर्ती होण्यासाठी खालील संशोधन पद्धतीचा वापर केला गेला. संशोधनाची उद्दिष्टे अभ्यासुन त्यानुसार संशोधन करण्याकरिता सर्वेक्षण व प्रयोगात्मक परीक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला. प्रस्तुत संशोधनकार्यामध्ये प्राथमिक तथ्य संकलनाकरीता सर्वेक्षण



(Survey Method) व प्रयोगात्मक परीक्षण (Experimental Method) पद्धतीचा प्रयोग करण्यात आला. प्रकरणाच्या या विभागात अध्ययनाकरीता उपयोगात आणल्या गेलेल्या कार्यपद्धतीचे विस्तृत वर्णन करण्यात आले आहे.

### *सामाजिक सर्वेक्षण*

सर्वेक्षण ह्याचा शाब्दिक अर्थ कोणत्याही वस्तूचे अथवा घटनेचे सूक्ष्म निरीक्षण व परीक्षण ही निरीक्षण परीक्षणाची प्रक्रिया जेव्हा सामाजिक घटनेशी (हैण्डबॉल व फुटबॉल खेळाडूंची खेळ भावना व मानसिक स्वास्थ्य) संबंधित असते तेव्हा त्या सर्वेक्षणाला सामाजिक सर्वेक्षण असे म्हणतात. ह्या अर्थाने पाहिल्यास सामाजिक सर्वेक्षण ही निरीक्षण परीक्षणाची एक वैज्ञानिक पध्दत असून तिच्याद्वारे कोणत्यातरी सामाकि समूहाचे अथवा घटनेचे वैज्ञानिक अध्ययन केले जाते. म्हणजे सामाजिक सर्वेक्षणात सामाजिक स्थिती अथवा समस्या ह्यांचे अध्ययन अंतर्भूत असते. सामाजिक सर्वेक्षण ही संज्ञा सर्वप्रथम ले-प्ले (Le-Play) ह्या शास्त्रज्ञाने उपयोगात आणली.

### *प्रयोगात्मक परीक्षण पद्धत*

संशोधन करतांना काही वेळा अशी परिस्थिती निर्माण होते की, ज्या वेळी ऐतिहासिक पद्धती, वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धती व विश्लेषणात्मक सर्वेक्षण पद्धती या तिन्ही पद्धती अपुऱ्या ठरतात. प्राप्त परिस्थितीमध्ये संशोधनकर्ता एकापेक्षा अधिक घटकांचा प्रभाव, परिणाम विचारात घेऊ इच्छितो, अशा परिस्थितीमध्ये संशोधकाने परिस्थितीचे काटेकोरपणे नियंत्रण केले पाहिजे. सर्वप्रथम एखाद्या घटकावर परिणाम करणाऱ्या सर्व चलांचा शोध घ्यावा लागल्यास. विविध चलांपैकी कोणते चल पूर्णपणे नियंत्रित करता येतील हे शोधावे लागेल. तसेच कोणते चल एखाद्च्याा विशिष्ट प्रमाणापर्यंतच नियंत्रित करता येतील हेही पाहावे लागेल, अश्या वेळेस प्रायोगिक चल वापरून त्याचा विविध घटकांवरील परिणाम अचूकपणे सांगता येईल.


प्रायोगिक पद्धतीच्या सोप्या प्रकारामध्ये प्रयोज्य, अगर विषयवस्तूची अभ्यासपूर्ण चाचणी घेतली जाते. नंतर त्या विषयवस्तूवर काही क्रिया प्रक्रिया केल्या जातात व झालेला फरक पाहण्यासाठी विषयवस्तू वा प्रयोज्याची परत चाचणी घेतली जाते. पद्धतीला कार्यकारण निर्धारण पद्धती, प्रयोगशाहा पद्धती, एकलगट पूर्वचाचणी, अंतिम चाचणी अभ्यास असे म्हणतात. काही लोकांच्या मते ती शोधनपद्धती आहे, परंतु हा अशास्त्रीय दृष्टिकोन आहे. नियंत्रण प्रायोगिक पद्धतीमध्ये नियंत्रणाची संकल्पना मूलभूत आहे. संशोधक दोन गटांपासून सुरूवात करतो, जसे या संशोधनकार्यात हैण्डबॉल व फुटबॉल खेळाडू या दोन गटांची निवड इच्छीकरण पद्धतीने केली आहे. त्या निवडीमध्ये विवक्षित जनसंख्या असलेल्या कोणत्याही शोध-अभ्यासातील मूलभूत तत्वाचा उपयोग केला जातो. एक गट दुसऱ्या गटाशी शक्य तितक्या जास्तीत जास्त गुणवैशिष्ट्यांशी समान राहील यांची दक्षता घेतली जाते. त्यामध्ये प्रामुख्याने वय, लिंग, आर्थिक स्थिती हे चटकन समजून येणारे निकष आहेत.

### *संशोधनाचे कार्यक्षेत्र :*

प्रस्तुत संशोधन करण्यासाठी संशोधन क्षेत्र म्हणुन अध्ययनकर्त्याने नागपूर शहराची निवड केली आहे.

### *अध्ययन क्षेत्र – नागपूर शहर*

सध्या महाराष्ट्राची उपराजधानी असलेले नागपूर पूर्वीच्या मध्य प्रांताची राजधानी होते. विदर्भातील महत्वाचे शहर अशी आज नागपूरची ओळख आहे. नागपूर हे भारताच्या बरोबर मध्यभागी वसलेले शहर आहे. ब्रिटिशकालीन भारताचा विचार करता देशाचा भौगोलिक मध्यबिंदू नागपूर शहरातच होता. त्या ठिकाणी झिरो माईल स्टोन स्तंभ उभारण्यात आलेला आहे. ब्रिटिश काळात या बिंदूपासूनच भारतातील सर्व अंतरे मोजली जात. लोकसंख्येच्या दृष्टीने नागपूर (शहर) तालुका जिल्हयात सर्वात जास्त लोकसंख्येया आहे (२० लाख ५२ हजार ६६) क्षेत्रफळाच्या दृष्टीने उमेरड तालुका जिल्हयात सर्वात मोठा आहे. त्याचे क्षेत्रफळ ६५५.७ चौ.कि.मी. इतके आहे.






### *अध्ययन विश्व :*

प्रत्येक संशोधनात संशोधकाचे पहिले कर्तव्य हे असते की, आपल्या संशोधनाविषयी माहिती घेणे, जसे लोकसंख्येचा आकार, उपलोकसंख्या कशाप्रकारे आहे यावर आधारलेले असावे. प्रस्तुत अध्ययन हे वस्तुनिष्ठ असावे या संदर्भात काळजी घेतली आहे. प्रस्तूत अध्ययनात नागपूर शहरातील आंतरमहाविद्यालयीन स्तरावर हैण्डबॉल व फुटबॉल खेळणारे सर्व विद्यार्थी यांचा अध्ययन विश्व म्हणून विचार करण्यात आला.

### *विषयांची निवड*

प्रस्तुत अध्ययनासाठी माहिती प्राप्त करण्याकरीता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत भाग घेणाऱ्या १८ ते २५ वयोगटातील खेळाडूंची निवड करण्यात आली.

### *नमुना निवड :*

विश्व हे व्यापक रूपात पसरलेले असल्यामुळे त्यातून नमुना निवडणे आवश्यक आहे. नमुना निवडीचे महत्व सांगतांना गुड आणि हॅट म्हणतात. तथ्य किंवा सामुग्रीचे विश्व हे व्यापक व विशाल असते त्यामुळे संशोधकाला तथ्य संकलन करण्यात मर्यादा पडतात. अशा परीस्थितीत संशोधन हा समूहातून एक भाग निरीक्षणासाठी व तथ्य संकलनासाठी निवडतो. त्यामुळे नमुन्याचे स्वरूप किंवा आकार हा समग्रापेक्षा, नेहमीच लहान असतो तरी सुद्धा नमुन्याच्या पाहणीवरून काढलेले निष्कर्ष, समग्रासंबंधीचे निष्कर्ष असतात. नमुना हा गट हा समग्राचा एक प्रतिनिधी अंश असल्यामुळेच हे शक्य होते. त्यामुळे नमुना निवड करते. अतिशय गुंतागुंतीचे परंतु तितकेच महत्वाचे कार्य आहे.

### *संशोधन आराखडा*

प्रत्येक संशोधनाचा एक निश्चित लक्ष्य आणि उद्देश असतो. या लक्ष्य व उद्देशाच्या पूर्ततेसाठी संशोधनात विषय वस्तूंच्या अनेक रूपाची पडताळणी केली जाते. अशा पडताळणीसाठी प्रयुक्त योजना हाच संशोधनाचा आराखडा होय. म्हणजेच संशोधन आराखडा एक तार्किक व व्यवस्थित योजना आहे.

प्रस्तुत संशोधनात निर्माण झालेल्या निष्कर्षाची संशोधन उद्देशाच्या दृष्टीने संबद्धता व संशोधन कार्यात मितव्ययता याची सांगड घालण्यात आली आहे. अर्थातच तथ्यांचे योग्य संकलन व विश्लेषण यासाठी आवश्यक अटीची पूर्तता करून वर्णनात्मक व विश्लेषणात्मक अशा मिश्र संशोधन आराखडयाची निवड करण्यात आली आहे.

### *तथ्य संकलन*

संशोधनाचा आधार तथ्य सामुग्री मानून संशोधक आपले संशोधन कार्य करतो. त्याच्या अभावी संशोधक संशोधन करू शकत नाही. संशोधनाची यशस्विता तथ्य सामुग्रीच्या साधनाच्या विश्वसनियेतवर निर्भर आहे. म्हणून संशोधकाला आपले अध्ययन सुरू करण्यापूर्वीच तथ्य सामुग्रीच्या संकलनाच्या विविध साधनांची संपूर्ण माहिती असावी लागते. वास्तविक स्वरूपात घडून आलेल्या आणि सर्वमान्य असणाऱ्या तसेच त्याची वास्तविकता, सर्वमान्य मापन पद्धतीद्वारे पुन्हा-पुन्हा पडताळता येऊ शकणाऱ्या मुर्त आणि अमुर्त स्वरूपाच्या घटनेला 'तथ्य' असे बोधनकर व अलोनी सांगतात.

### *खेळ भावना परीक्षण*

हैण्डबॉल व फुटबॉल खेळाडूंच्या खेळ भावनेचे परीक्षण करण्याकरिता दुबे (१९८८) ने तयार केलेली खेळ भावना प्रश्नावलीचा प्रयोग करण्यात आला. या प्रश्नावलीत एकूण ४० परिस्थितीजन्य प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाकरिता ३ संभावित उत्तरे दिलेली आहेत. त्यातून खेळाडूंना एक उत्तराची निवड करायची असते. ही प्रश्नावली सुध्दा महाविद्यालयीन खेळाडूंच्या खेळ भावनेचे मापन करण्याकरिता वैध व उच्च स्तरावर

विश्वसनीय आहे.

*मानसिक स्वास्थ्य परीक्षण*

हैण्डबॉल व फुटबॉल खेळाडूंच्या मानसिक स्वास्थ्याचे परीक्षण करण्याकरिता आगाशे व हेलोडे यांनी तयार केलेली मानसिक स्वास्थ्य प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. ही प्रश्नावली महाविद्यालयीन खेळाडूंकरिता वैध व विश्वसनीय आहे. वर नमुद केलेल्या दोनही प्रश्नावली परीशिष्ठ १ व २ मध्ये प्रस्तुत केलेल्या आहेत.

प्रस्तुत अध्ययनात संशोधनकर्त्याने निवडक उत्तरदात्यांवर सर्व चाचण्यांचे प्रायोगीक तत्वावर परिक्षण केले. याकरिता प्रश्नावली व प्रायोगीक पद्धतीच्या आधारे तथ्य संकनल करण्यात आले. सहभागी झालेल्या या छोटया समूहावर सर्व तथ्य तपासण्यात आले आणि तपासात आढळलेल्या त्रुटी ओळखून प्रमाणित पद्धतीप्रमाणे त्यात सुधारणा करण्यात आल्या. वरील निष्कर्ष आपल्या अभ्यासाच्या उद्दिष्टानुसार आहेत किंवा नाही यांचे पृथःकरण व मूल्यमापन करण्यात आले. घेण्यात आलेल्या परीक्षणात, अभ्यासाच्या उद्दिष्टानुसार, त्रुटी व उणिवा दुर करण्यासाठी तथ्यांची पुर्णः तपासणी व योग्य ते बदल करण्यात आले.

*माहितीचे सांख्यिकीय विश्लेषण :*

सांख्यकीय तंत्रातील विविध ग्राह्याता चाचणीचा विशेषत्वाने उपयोग करण्यात आला. त्या आधारावर निष्कर्ष काढले गेलेत. प्राप्त माहितीवरुन मध्यमान (डमंद), मानक विचलन (Standard Deviation), वारंवारीता (थ्तमुनमदबल) व बहुलक (डवकम) काढण्यात आले. अभ्यासातील विविध घटक, पडताळण्याकरिता देण्यात आलेले गृहित प्रमेय आणि वापरण्यात आलेला संशोधनाचा आराखडा लक्षात घेता श्जश टेस्टचा वापर करण्यात आला. ेपहदपपिबंदबम स्मअमस ०<sup></sup>०५ ठरविण्याात आली. वरील सर्व प्रक्रियानंतर निष्कर्ष जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ कसे राहतील यांची दखल घेण्यात आली व सांख्यिकीय परीक्षणावरून प्राप्त परीणामांना योग्य त्या आलेख व तक्त्यांचा वापर करून प्रस्तुत करण्यात आले.

*संदर्भ ग्रंथ*

१.घाटोळे.रा.ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती २००६–१०.पृ.क्र. १ ते २३.
२.बोधनकर सुधीर, प्रा. अलोनी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, २००३:८६
३.भांडारकर पु.ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ, ग्रंथ निर्मिती मंडळ, विद्या बुक्स, औरंगाबाद, १९७६:१४७.
४.जरारे विजय, संशोधन प्रणाली, सुविधा पब्लिशर्स, ३५–ए, नटराज नगर, इमली फाटक, जयपूर, १९९५:७६
५.बोधनकर सुधीर, प्रा. अलोनी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३:१४७.
६.डॉ. अभय कुमार श्रीवास्तव, “शारीरिक शिक्षण परीक्षण एवं मापन” प्रकाशन अमित ब्रदर्स, १९९३ पृ.क्र. ६०
७.डी.एल. फिलीप्स एंड जेम्स ई. हॉरनेक मेजरमेंट इन फिजीकल एज्युकेशन, पृ.२६२–२६३
८.वर्मा ओमप्रकाश, सामाजिक अनुसंधान की विधियाँ, ग्रन्थुत प्रिग्टिंग प्रेस सांकेत नगर, कानपूर, १९८७:३३५
९.Young P.V., Scientific Social Survey and Research, P. 509

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com